

समाजकार्य पुरस्कार

# राजेंद्र बहाळकर

# विशेष कृतज्ञता पुरस्कार

## सुप्रिय सन्मित्र

**चेहऱ्यावर न** ढळणारं मंदस्मित - आश्वासक. वरवरचं न वाटणारं. समोरच्याचं ऐकण्याचा खूप पेशन्स. ऐकतानाही चेहऱ्यावर तोच सस्मित भाव. बोलताना त्या स्मिताचं रूपांतर हळूहळू एका सकारात्मक ऊर्जेत होत जातं आणि कृतीमध्ये तर ते उतरतंच असा आमचा सुप्रिय सन्मित्र – राजू! राजेंद्र बहाळकर. तर अशा आमच्या या सुप्रिय सन्मित्राचा महाराष्ट्र फाउंडेशन ‘विशेष कृतज्ञता पुरस्कार’ देऊन गौरव करत आहे याचा आनंद, कौतुक आणि समाधान वाटतं आहे.

राजू हा खरंतर साने गुरुजींचा धडपडणारा मुलगा आहे. साने गुरुजींची कर्मभूमी खानदेश. खानदेशातल्या धुळे इथे मध्यमवर्गीय एकत्र कुटुंबात राजू जन्मला, वाढला. इयत्ता चौथीतच, त्याच्या मोठ्या चुलतभावामुळे - विजय बहाळकर यांच्यामुळे - तो राष्ट्र सेवादलाच्या शाखेत जायला लागला. त्या वेळी सेवादलाचे शाखाशिक्षक असलेले संवेदनशील आणि अभ्यासू कार्यकर्ता सुरेश पगारे याच्या संपर्कात तो आला. राजूच्या विचारविश्वाच्या व भावविश्वाच्या विकासात सुरेशचा मोठा वाटा राहिला. सुरेश या युवकांना भरपूर बौद्धिक व्यायामही देत असे. त्यातून समतेविषयी, लोकशाही - धर्मनिरपेक्षतेविषयी, इथल्या जातिव्यवस्थेविषयी, शोषणाविषयीची जाण वाढत गेली; भूमिका विकसित

होत गेली आणि एका समाजवादी कार्यकर्त्याची जडणघडण होत गेली. सुरेशने या मुलांना प्रत्यक्ष झोपडपट्ट्यांमध्ये, रोजगार हमी कामगारांमध्ये नेलं आणि वंचितांच्या प्रश्नांचं विश्व या मुलांपर्यंत पोहोचवलं. हे दर्शन आणि त्या अनुषंगाने सेवादलाच्या शाखेत होणाऱ्या चर्चा यांतून राजू आणि त्याच्या साथींच्या जाणिवा विकसित होत गेल्या.

त्याच सुमारास, राजूचं महाविद्यालयीन शिक्षण सुरू असतानाच 'छात्रभारती'ची स्थापना झाली. 'छात्रभारती'चा एक संस्थापक सदस्य राजू हा होता. 'छात्रभारती'चा उत्तर महाराष्ट्र विभागाचा संघटक म्हणून त्याने काम केलं. समाजवादी युवक-विद्यार्थ्यांच्या संघटना लयाला गेलेल्या असताना आणि संघपरिवारातील अखिल भारतीय विद्यार्थी परिषद जोमात असताना उभी झालेली छात्रभारती ही संघटना गरीब, बहुजनसमाजातील विद्यार्थी-युवकांना आपली वाटली. त्यांचे प्रश्नही छात्रभारतीने उचलले, लावून धरले, धसाला लावले. दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांच्या फीमाफीचं आंदोलन छात्रभारतीने छेडलं. त्यासाठी उपोषणाचा मार्ग अवलंबला. अखेर सरकारने या विद्यार्थ्यांच्या मागण्या मान्य केल्या. राजूच्या आयुष्यातला हा मोठा उभारीचा अनुभव होता. शांततामय मार्गावरचा विश्वास देणारा, आत्मनिग्रहाची परीक्षा घेणारा आणि आत्मविश्वास वाढवणारा तो अनुभव होता. कार्यकर्ते असेच घडत जात असतात.

धुळ्यात 'नर्मदा बचाओ आंदोलना'चं भक्कम केंद्र उभं राहिलं आणि अर्थातच राजूसारखा संवेदनशील, उत्साही कार्यकर्ता त्यामध्ये ओढला गेला. इथेच केव्हातरी राजूने पूर्णवेळ कार्यकर्ता व्हायचं ठरवलं. दरम्यान राजू गणित विषय घेऊन बी.एससी. झाला होता. घरच्यांच्या काही अपेक्षा असणारच या हाताशी आलेल्या मुलाकडून. राजू बुद्धिबळ हा खेळ राष्ट्रीय स्तरावर खेळत होता आणि त्या गुणवत्तेच्या आधारे त्याला राष्ट्रीकृत बँकेत नोकरीची संधी चालून आली होती. पण राजूने मात्र पूर्णवेळ कार्यकर्ता व्हायचं ठरवलं आणि तसा तो झाला. सेवादलाचे दीडशे आणि छात्रभारतीचे दीडशे अशा तीनशे रुपये मानधनावर राजू पूर्णवेळ कार्यकर्ता बनला खरा, पण ते मानधनही कधीच वेळेवर मिळत नव्हतं. स्वभाव संकोची, भिडस्त. संघटनेची परिस्थितीही कळत होतीच. त्यामुळे कुणाला काय सांगणार! प्रधानसरांच्या शिफारसीने राजू महाराष्ट्र आरोग्य मंडळात रुजू झाला. त्या वेळी, दादा गुजर यांच्या काळात, महाराष्ट्र आरोग्य मंडळाचं स्वरूपही एका सामाजिक संस्थेसारखंच होतं. तेथील प्रशासकीय कामांमध्ये राजू गुंतला.

दरम्यान, त्याची धुळ्यातली सेवादलातली मैत्रीण, साथी, वंदना वैद्य त्याच्या आयुष्यातही आली होती. दोन्ही कुटुंबांतून विरोध असताना त्यांनी आंतरजातीय लग्न केलं. वंदनाने राजूला अतिशय सुरेख साथ दिली. खरंतर दोघांनी एकमेकांना. दोघांना कष्टांची सवय होतीच, दोघं कार्यकर्ते म्हणून विकसित झालेले होते. त्यामुळे त्यांच्या अगदी पहिल्या पत्राच्या



खोलीतल्या घरातही कार्यकर्त्यांचा राबता राहिला. महाराष्ट्रभरातून 'महाराष्ट्र आरोग्य मंडळा'च्या साने गुरुजी रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या कार्यकर्त्या-मित्रांसाठी त्यांचं घर हे हक्काचं ठिकाण राहिलं.

मात्र राजूमधला कार्यकर्ता या नोकरीसदृश कामात अस्वस्थच होता. राजूने 'महाराष्ट्र आरोग्य मंडळा'तली नोकरी सोडली व पुन्हा तो पूर्ण वेळ सामाजिक कामासाठी मुक्त झाला.

दरम्यान सेवादलाचा जिल्हा कार्यवाह, महाराष्ट्राचा कार्याध्यक्ष, एस.एम.जोशी जन्मशताब्दी समितीचा सरचिटणीस अशा विविध जबाबदाऱ्या राजूवर पडत गेल्या आणि त्या तो निभावत गेला. सध्या तो हमीद दलवाई इस्लामिक रीसर्च इन्स्टिट्यूटचा सचिवही आहे, आणि त्याद्वारे विशेषत: मुस्लीम समाजाशी संवाद आणि प्रबोधनाचं काम करतो आहे. त्याच्यात प्रचंड तडफ आणि ऊर्जा आहे, तसंच सर्वांना सोबत घेऊन जाण्याची वृत्ती. त्यामुळे सर्वांना जोडत तो सेवादलाचं आणि सेवादल प्रवृत्तीचं काम वाढवत राहिला.

सेवादलातील शिबिरात मुलं, युवक रमत नाहीत असा त्याचा अनुभव होता. राजूने खेळ, गाणी, संवाद, चर्चा, कृतिसत्रं यांच्या आधारे कार्यशाळांचं तंत्र विकसित केलं. त्याला खूपच चांगला प्रतिसाद मिळू लागला. मागील ६ वर्ष राजू या कार्यशाळांद्वारे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचला आहे. नुकताच त्याने ६०० कार्यशाळांचा टप्पा पूर्ण केला आहे. राजूची शैली अशी आहे की, विद्यार्थी, मुलं-मुली त्याच्यासोबत अगदी मोकळी होतात. एका आदिवासी शाळेतील सातवीतील दोन मुलींवर अतिप्रसंग होऊन त्यातून त्यांना दिवस गेले होते. तिथले शिक्षक अगदी हादरून गेले होते. त्यांनी राजूला मदतीला बोलावलं. राजूने आपल्या आश्वासक शैलीत तो प्रसंग हाताळला.



असे अनुभव राजू सततच घेतो. खास करून लैंगिकतेवरच्या त्याच्या सत्रानंतर मुलं-मुली त्याला भेटतात; आपले अनुभव, समस्या त्याला सांगतात. अगदी आपली आई, बहिणी, मैत्रिणी यांना होणारा त्रास त्याला सांगतात. एक अनौपचारिक काउन्सिलिंगच असतं हे. असा विश्वास त्यांच्या मनात निर्माण करणारा हा पुरुष कार्यकर्ता - समुपदेशक!

राजूचं आणखी एक वैशिष्ट्य सांगायला हवं. तो एक चांगला प्रशासक आहे. प्रशासकीय, आणि खास करून करप्रणाली, चॅरिटी कमिशनची कार्यपद्धती, याबद्दल त्याचा चांगला अभ्यास आहे. ओघानेच, अनेक सामाजिक संघटना-संस्थांचा तो आर्थिक सल्लागार बनला आहे. अनेक संस्थांचा विश्वस्तही. 'जनसहयोग ट्रस्ट', 'नर्मदा नवनिर्माण अभियान', 'शाश्वत विकास न्यास' या आमच्या संस्थांचा तो विश्वस्त अथवा सल्लागार आहे.

असा राजू. सुप्रिय सन्मित्र. घडता-घडवता कार्यकर्ता. आश्वस्त करणारा विश्वस्त.

सुनीती सु.र.
napm.suniti@gmail.com / ९४२३५७१७८४